SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# विद्यार्थी विकास विभाग

Dr. T. M. Chougale
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/१३५ दि. १२/०८/२०२५

प्रति,
**मा. प्राचार्य/प्राचार्या,**
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :— जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव २०२५—२०२६ प्रवेशिका भरणेबाबत.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठाचा ४५ वा युवा महोत्सव २०२५—२०२६ द्विस्तरीय पध्दतीने आयोजित केला जाणार आहे. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव खाली नमुद केल्याप्रमाणे आयोजित करण्यात आले आहेत.

| अ.क्रं | जिल्हा | यजमान महाविद्यालय | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सातारा | सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | दि. ०९/०९/२०२५ |
| २. | सांगली | कर्मवरी भाऊराव पाटील महाविद्यालय, उरुण इस्लामपुर | दि. ११/०९/२०२५ |
| ३. | कोल्हापूर | शिवराज कला वाणिज्य आणि डि. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | दि. १३/०९/२०२५ |
| ४. | मध्यवर्ती | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज | दि. १८/०९/२०२५ ते दि. २०/०९/२०२५ |

**तरी वरीलप्रमाणे जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाबाबत नोंद घ्यावी व आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा संघ बनवून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे. या अनुषंगाने खालील मुद्दे विचारात घ्यावेत.**

१. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका **मंगळवार दि. २६/०८/२०२५** रोजी **रात्री १२.०० वाजेपर्यंत Online** भरावयाच्या आहेत.
२. महाविद्यालयांनी सहभागी होणाऱ्या कलाप्रकारांसाठी **प्रवेशिका Online भरावयाच्या** आहेत. Hard copy आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही.
३. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. १००/— व प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी रु. २००/— इतके प्रवेश शुल्क भरावयाचे आहे. महाविद्यालयांनी सहभागी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे शुल्क Payment Gateway ने Online भरणेचे आहे.
४. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना यथावकाश ई—मेलद्वारे पाठविणेत येईल.
५. जास्तीत—जास्त विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होता यावे यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक माहे सप्टेंबर, २०२५ च्या दुसरा आणि तिसरा आठवडा हा कालावधी वगळून निश्चित करावे.

.....२

जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव प्रवेशिका भरणेबाबतची ऑनलाईन लिंक खालीलप्रमाणे आहे.

http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login

६. सन २०२५—२०२६ जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी उपरोक्त लिंकवर क्लिक करावे व Online प्रवेशिका आपले महाविद्यालयास विद्यापीठाचे Affilation विभागाकडून देण्यात आलेल्या Login ID व Passward चा वापर करुन Affilation पोर्टल Open करावे. त्यानंतर सदर पोर्टलच्या डाव्या बाजूस असणाऱ्या Youth Festival/Avishkar या Icon ला क्लिक केल्यानंतर Youth Festival ला क्लिक करा. त्यानंतर सदर युवा महोत्सव Online प्रवेशिका भरणेचा फॉर्म Open होईल.

७. सदरचा फॉर्म Open झाल्यानंतर प्रथम आपले संघाची संपूर्ण एकत्रित माहिती भरावी. सदरची माहिती भरुन झाल्यानंतर Submit बटनावर क्लिक करावे व त्यानंतर Lock बटन क्लिक करावे व त्यानंतर स्पर्धानिहाय Online फॉर्म भरुन Online Payment करावे.

८. **कलाकार व विद्यार्थी साथीदार यांचे शिकत असलेले वर्ग व जन्मतारीख प्रवेशिकेत नोंदविणे आवष्यक आहे. तसेच स्पर्धे ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांचे जन्म तारखेचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. (दहावी प्रमाणपत्र/जन्मदाखला/शाळा सोडलेचा दाखला साक्षांकित झेरॉक्स प्रत)**

९. **युवा महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळया प्रवेशिका ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची स्पर्धा कलाप्रकारानुसार एक प्रत सर्व कागदपत्रे (जन्मतारखेचा पुरावा, चालु वर्षाची प्रवेश पावती, महाविद्यालय ओळखपत्र, गतवर्षीच्या परीक्षेचा निकाल सर्व साक्षांकित प्रती) जोडून संयोजक महाविद्यलयाकडे स्पर्धेच्या आदल्या दिवशी जमा करुन आपल्या संघाची नोंदणी करावी.**

१०. यावर्षीपासुन जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामधील स्पर्धामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

- **एकल लोकवाद्यवादन** हा वैयक्तिक कलाप्रकार जिल्हास्तरीय युवा महोत्सवामधून कमी करण्यात आला आहे व **थेट मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी** घेण्यात आला आहे.
- सन २०२५—२०२६ पासून **मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये शोभायात्रा** हा सांघिक कलाप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.
- जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढण्यात येत होते. सन २०२५—२०२६ पासून **जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय, क्रमांकाबरोबरच चौथा व पाचवा क्रमांक** काढण्यात येणार आहे. तसेच सदरचे १ ते ५ क्रमांक **मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये** सहभागी होण्यासाठी पात्र होतील.

तरी उपरोक्त सर्व मुददे अवलोकनी घेवून जास्तीत जास्त महाविद्यालयांनी युवा महोत्सवामध्ये सहभाग नोंदवावा हि विंनती.

कळावे,

आपला विश्वासू

प्र.संचालक
विद्यार्थी विकास

सोबत: युवा महोत्सव नियमावली पुस्तिका व ऑनलाईन फॉर्म भरावयाच्या स्टेप्स